मनोगत । अरुण टिकेकर

# वैचारिक स्वातंत्र्याची मोठी लढाई खेळावी लागणार आहे!



'पत्रकार' व 'ग्रंथकार' अशी दुहेरी ओळख असणाऱ्या अरुण टिकेकरांनी, ग्रंथलेखन करताना न्या. महादेव गोविंद रानडे यांना, तर पत्रकारिता करताना गोपाळ गणेश आगरकरांना आदर्श मानले आहे. स्थानीय इतिहास व सांस्कृतिक इतिहास हे त्यांच्या अभ्यासाचे व संशोधनाचे विषय राहिले आहेत. तब्बल अकरा वर्षे 'लोकसत्ता' दैनिकाचे संपादक म्हणून काम करताना नि:पक्ष उदारमतवादी भूमिकेचा पुरस्कार करून त्यांनी स्वतंत्र विचार - निर्भय उच्चार - चौफेर संचार हा बाणा स्वीकारला होता. सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय घटना-घडामोडींचे ताणेबाणे उलगडून दाखवणारे लेखन करताना त्यांनी सम्यक्, सकारात्मक व तारतम्यपूर्ण विचार कसा करावा याचे वस्तुपाठ समोर ठेवले आहेत. मराठी व इंग्रजी या दोन भाषांत मिळून वीस ग्रंथ नावावर असलेल्या टिकेकरांना मिळालेला 'जीवनगौरव' पुरस्कार म्हणजे, १९७५ ते १९९० या काळातील अभ्यासक-संशोधकाला व १९९० ते २००५ या काळातील संपादक-पत्रकाराला 'मानवंदना' आहे.

भीड चेपत गेल्यामुळे कशाचीही चाड न राहिलेल्या समाजात 'संकोच' आणि 'तारतम्य' हे शब्द फक्त शब्दकोषातच उरावेत, समाज-जीवनात त्यांना तिलांजली दिली जावी, विचारांचं अस्तित्व नष्ट व्हावं, दंभ आणि फसवणुकीचं साम्राज्य वाढावं, आधुनिकतेच्या नावानं समाज उथळपणा आणि उच्छृंखलता यांच्या आहारी जावा, धर्मधारणा संपली तरी धर्माचं अवडंबर सुरू राहावं, हे सारं काय दर्शवितं? आपला समाज काल-परवापर्यंत ज्यांना सद्‌गुण समजत होता, त्यांची कास सोडल्यामुळे गर्तेत उडी घेतल्यासारखा खोल चालला आहे. पुढे चाललेला समाज पुन्हा परतीची पावलं उचलू लागल्याची ही सारी लक्षणं आहेत.

अर्थात हे असंच होत राहणार, म्हणून हतबलतेची भावना व्यक्त करण्याइतकं अगतिक व्हायचं आपल्याला कारण नाही. जगातला प्रत्येक समाज आपल्या मार्गक्रमणात कधी ना कधी अशा प्रकारच्या अवस्थेतून गेला आहे त्यामुळे आजची परिस्थिती कायम टिकणारी नाही हे तर खरेच, पण प्रबोधनाच्या मार्गावर व्यवस्थितपणे वाटचाल करणाऱ्या आपल्या समाजाचं असं का व्हावं? बारकाईनं विचार केला तर आढळून येईल की एकेक करून आपल्या प्रत्येक महापुरुषाच्या विचारांचा आपण पराभव केला आहे. महात्मा फुल्यांनाच काय, पण न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, 'सुधारक'कार आगरकर, 'समाजस्वास्थ्य'कार र.धों.कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा आपण पराभव केला आहे. जो समाज केवळ आपल्या महापुरुषांचं नाममहात्म्य जपत राहतो आणि त्यांच्या विचारांना मात्र विस्मृतीत टाकतो, तो समाज इतिहासाचं केवळ ओझं वाहतो असंच म्हणावं लागेल. वास्तविक, इतिहासाभ्यासातून शिकलेल्या धड्यांमुळे दृष्टीस आलेल्या चुका टाळण्याकडे समाजाची वृत्ती आणि प्रवृत्ती असली पाहिजे.

विचारांची साथ-संगत सोडलेला समाज आधुनिकतेच्या नावाखाली इतिहासातील काही प्रसंग उगाळत बसतो आणि आत्मवंचना करून घेत राहतो. तात्कालिक मतलबासाठी तो आपली शक्ती खर्च करतो. राजकारणाने खालची पातळी गाळली आहे आणि त्याचा परिणाम तलावातलं सर्व पाणी संपविल्यानंतर ते उपसणारे जसे चिखलात अडकतात, तसा आपला समाज राजकारणाच्या दलदलीत रुतला आहे. भौतिक सुधारणा होत असताना सामाजिक सुधारणा होत नसल्याचं दिसत आहे. समाज-मन सुधारल्याशिवाय कोणतीही सुधारणा कायमस्वरूपी होत नाही, हे तत्त्व समाजसुधारकांना पटलेलं नाही. भौतिक सुधारणांचं तात्कालिक यश हे वैचारिक सुधारणांविना नैतिक अवनतीकडे घेऊन जात असतं. प्रत्येक क्षेत्रात आज ज्या प्रकारची भ्रष्टाचाराची प्रकरणं उजेडात येत आहेत, ती पाहिली की हे पटेल. पैसा मिळवायचा, जीवनानंद घ्यावयाचा, पण तो किती प्रमाणावर आणि कशासाठी, याचा विचार आपण करत नाही. आर्थिक लाभही विकृतीच्या स्तरापर्यंत गेला असेल तर समाज-प्रकृती धडधाकट आहे, असं म्हणता येणार नाही.

आपल्या समाजाचं हे असं का झालं, याची अनेक कारणं सांगता येतील. त्या कारणांमध्ये सर्वांत वरचं कारण समाजाचं वैचारिक सामर्थ्य वाढलं नाही हे आहे. 'वैचारिकता ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे' हे न मानणारा समाज आपल्यातल्या विद्वानांची कदर करेनासा होतो, एवढेच नव्हे तर त्यांच्या विचारांना 'क्रियेवीण वाचाळता' म्हणायला लागतो. उपेक्षितांचं जिणं जगणाऱ्या विद्वानांना चरितार्थाची पंचाईत पडते तेव्हा ते छोट्या, छोट्या मतलबासाठी 'नरो वा कुंजरो वा' करत कार्यभाग साधतात, अन्यथा भीरुतेचा आधार घेत अळीमिळी गुपचिळीचं धोरण स्वीकारून स्वार्थी होतात. विचारवंतांचं, विद्वानांचं स्वार्थी होणं अंतिमत: समाजाचं अनहित करणारंच ठरतं. वैचारिकता कालबाह्य झाली आहे का? विद्वान निरुपयोगी झाले आहेत का? यावरच चर्चा होत राहते. ताठ मानेनं जगणाऱ्या आणि लोभांपासून दूर राहिलेल्या विचारवंतांचं अस्तित्व सरकारी यंत्रणेला कुसरीसारखं का खुपतं हे सांगण्याची आवश्यकता नाही, पण असे तटस्थ वृत्तीने, राग-लोभाची पर्वा न करता समाजाला युक्तीच्या चार गोष्टी सांगणारे विचारवंत समाजोपयोगी असतात आणि कोणत्याही लोकशाही यंत्रणेत जे समाजोपयोगी असतं, त्याला योग्य मान देणं, वेळोवेळी विद्वानांची कदर करणं हे शासन-यंत्रणेचं कर्तव्य बनतं. मग ते शासनाच्या निर्णयाचं स्वागत करोत की त्याविरुद्ध रान उठवोत. हे विचारवंत विक्षिप्त असले, माणूसघाणे असले, सरकारधार्जिणे नसले तरी त्यांचा समाजानं योग्य मान राखला पाहिजे. सत्ताधीशांकडून त्यांची आबाळ होणं हे अयोग्य असलं तरी क्षम्य मानता येईल, कारण सत्ताधाऱ्यांना खुशमस्कऱ्यांची आवश्यकता असते आणि कोणत्याही समाजात शासनधार्जिण्या विद्वानांची कमी नसते. शासनाकडून होणाऱ्या मान-सन्मानाची तटस्थ, समाजहितदक्ष विचारवंत फारशी तमा बाळगत नाहीत. अर्थात त्यामुळे शासनाने त्यांची उपेक्षा करावी, असं नाही. उलट अशांचा मान-मरातब राखणं हे शासनाच्या प्रगल्भतेवर आणि प्रबोधनावर आधारित असतं. प्रवाहपतित न होता प्रवाहाविरुद्ध पोहत जनमत तयार करण्याचं आणि लढण्याचं सामर्थ्य या तटस्थ विचारवंतांत असतं, म्हणून त्यांच्याकडून सामाजिक सुधारणांची अपेक्षा करता येते.

लोकशाहीत विचारवंतांवर सामाजिक जबाबदारी असते, ती हीच. विचारवंत कोणाला म्हणायचं? प्रत्येक व्यक्ती ही विचारक्षम असतेच. मग हेच कोण एवढे टिकोजीराव? स्वातंत्र्यपूर्व काळात उदारमतवादी समजले जाणारे जे व्यवसाय होते- त्यातील व्यावसायिक म्हणजे लेखक-साहित्यिक, पत्रकार-संपादक, शिक्षक-प्राध्यापक हे तीन महत्त्वाचे. व्यावसायिक नीतिमत्तेची चाड आवश्यक असणारे इतर दोन-

वकिली आणि वैद्यकीय- पेशे सोडून देऊ, कारण त्यांच्यासाठी व्यावसायिकतेचे वेगळे निकष आहेत. पण लेखक, पत्रकार, प्राध्यापक या तीन व्यवसायांतील मंडळींनी आपापली व्यावसायिकता सांभाळण्याचे जवळजवळ सोडून दिल्याचा अनुभव येत आहे. आपापल्यावरील सामाजिक जबाबदारीचं भान त्यांना राहिलेलं नाही. कदाचित हताश होऊन त्यांनी भीरुतेचा किंवा असंवेदनक्षमतेचा आधार घेतलेला आहे. ज्यांनी समाजाच्या अपप्रवृत्तींवर प्रहार करत सुधारणा घडवून आणावयाच्या, त्यांनीच कर्तव्याकडे पाठ फिरवल्यावर प्रबोधनाचं कार्य कोणी पुढं चालवायचं? आत्मवंचना करून घेत सरकारी प्रशस्तीच्या आधारे सर्व प्रकारची मतलबी गणितं मांडत इतर व्यावसायिकांप्रमाणेच लाभ पदरात पाडून घेणाऱ्या तथाकथित विचारवंतांनी समाजाला सतत जागृत ठेवण्याचं कर्तव्य केलं नाही, तर समाज माघारी फिरून प्रबोधनाच्या पाऊलखुणा मिटवतच जाणार. असं होणं ना समाजाच्या हिताचं ना राज्यकर्त्यांच्या. म्हणून असं म्हणावंसं वाटतं, की जितक्या लवकर उदारमतवादी व्यवसायातली मंडळी आपली सामाजिक जबाबदारी पार पाडायला सज्ज होतील, तितकं समाजाच्या दृष्टीने ते हितकारी होईल.

**आज माध्यमं आर्थिक कोंडीत सापडली आहेत, प्राध्यापक सरकारी बंधनात अडकले आहेत, लेखक मंडळी शहामृगासारखी जमिनीत तोंड खुपसून बसली आहेत. वैज्ञानिकांनी आम समाजापासून आपली नाळ तोडण्यातच इतिकर्तव्यता मानली आहे.**

**अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच सर्व बाजूंनी आणि सर्व प्रकारे होत असताना समाजात स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते नसावेत, हे उद्याच्या नागरिकांना वैचारिक स्वातंत्र्याची मोठीच लढाई खेळावी लागणार असल्याचंच लक्षण आहे. 'भावना दुखवण्या'चा बाऊ समाजात होत राहण्यानं उद्याच्या इतिहासकारांना सत्य इतिहास लिहिणं कठीण होईल. पत्रकारांना सत्य बातमी प्रसिद्ध करणं मुश्किल होईल. साहित्यिकांना आपली प्रतिभा असत्याच्या दावणीला बांधावी लागेल.**

सामाजिक न्यायाकडे वाटचाल हीच राष्ट्राची प्रगती, हे पटलेल्यांना सर्व प्रकारचं उत्तेजन आणि वैचारिक शक्तीचं पाठबळ मिळणं आवश्यक असतं, कारण काळाच्या फार मागं राहिलेल्या निरुत्साहींना तसेच काळाच्या फार पुढं धावणाऱ्या अतिउत्साही मंडळींना जेवढ्या जवळ आणता येईल, तेवढं आणण्याची जबाबदारी विचारवंतांवर असते. त्यामुळे दोहोंचाही रोष पत्करावा लागला तरी चालेल, पण 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' हा आगरकरी बाणा विचारवंतांकडे असणं अत्यावश्यक असतं. आजचा न्याय हा उद्याचा अन्याय ठरू शकतो, हे सांगण्याची जबाबदारी समाजातील विचारवंतांवरच असते. राज्यकर्ते ती पार पाडू शकणार नाहीत. शिक्षणाचा खेळ मांडणाऱ्यांना व सत्ताधाऱ्यांना राजकारण, वाङ्मय, संस्कृतिकारण या तीनही क्षेत्रांत आपल्या चुकांची शिक्षा होऊ शकते, हे कोण सांगणार? नेमकं हे करण्याची जबाबदारी विचारवंत टाळत आहेत, परिणामी आपला प्रभाव ते गमावून बसलेले आहेत. आपली समाजाकडून उपेक्षा, उपहास करून घेत आहेत. आपण नोकरीपेशा मिळवून देणाऱ्या 'व्यावसायिक प्रशिक्षणा'च्या आहारी जाऊन जीवनवाद शिकवणाऱ्या तत्त्वज्ञानादि विषयांची हेळसांड करत आहोत, असे खडे बोल विचारवंतांनीच शासनाला सुनवत राहिलं पाहिजे. ते करण्यासाठी विचारवंतांना आपापलं माध्यम आहे, आपापलं प्रभावक्षेत्रही आहे. उदाहरणार्थ, सर्जनशील साहित्यिकसुद्धा आपल्या वाङ्मयीन कृतीच्या माध्यमातून जनमतावर प्रभाव पाडू शकतात. कालपरवापर्यंत हे होत होतं. आता साहित्यिक 'पलायनवादी' झाले आहेत. शब्दांच्या जंजाळात अडकून पडले आहेत.

ज्या समाजातील विचारवंत आपली सामाजिक जबाबदारी टाळत आहेत, सत्य सांगायला घाबरत आहेत, तटस्थपणा सोडून मतलबामुळे नि:पक्ष राहण्याचं टाळत आहेत, अन्यायाविरुद्ध आवाज उठवत नाहीत, सत्ताधाऱ्यांच्या लोकानुनयी निर्णयांना वेळोवेळी आव्हानं देत नाहीत, तो समाज मानसिकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या सर्व क्षेत्रांत खुजेपणाच अनुभवणार. शासन-संमत आणि पुरस्कारित विचारवंतांची यादी प्रतिवर्षी कितीही वाढत गेली तरीही समाजसुधारणा होणार नाही. ज्या समाजात राजकीय नेते विचारवंतांचा उपहास करत राहतात, त्यांची उपेक्षा करत राहतात, त्या समाजात गुणवत्ता ही नेहमीचीच डोकेदुखी राहणार. ज्या समाजातील प्रत्येकजण आर्थिक यशाच्या मागे पळत आहे आणि बौद्धिक आव्हानांचा मात्र तिटकारा करत आहे, ज्या समाजातील विचारवंत सत्ताधाऱ्यांना दुखवण्याच्या भीतीनं कोणत्याही महत्त्वाच्या घटनेवर साधकबाधक चर्चा करण्यापासून दूर पळत आहे, विचार-संघर्षाला घाबरत आहे, कोणतीही सामाजिक समस्यांची उकल करत नाहीत, तो समाज वैचारिकतेची कास सोडून असहिष्णुता आणि हिंसात्मक मार्गाचा अवलंब करत सामाजिक सौहार्द आणि शांतता यांचा भंग करण्यातच स्वत:ला

धन्य मानत राहणार. वैचारिकतेची साथ सोडलेला समाज स्वत:चीच हानी करत राहतो, पण त्या हानीची तमा बाळगण्याचं भान त्याला उरत नाही. मग सामाजिक सुधारणांच्या बाबतीत तो दक्ष राहणार तरी कसा?

ही परिणाम-साखळी विस्तारानं सांगायचं एक कारण आहे. स्वातंत्र्य हे दोन प्रकारचं असतं, असं म्हटलं जातं. एक असतं सकारात्मक तर दुसरं नकारात्मक. शासकीय व अशासकीय बंधनांविना जे असतं ते सकारात्मक तर दुसऱ्या प्रकारच्या स्वातंत्र्यात बंधनमुक्तीबरोबर प्रगतीसाठी साह्यही केलं जातं. या दोन प्रकारच्या स्वातंत्र्याचा विचार करता १९७५ ची आणीबाणी पहिल्याचा संकोच करणारी होती, तर आताची परिस्थिती दुसऱ्या प्रकारच्या स्वातंत्र्याचा संकोच करणारी आहे असं वाटतं. यात बदल व्हावा असंही वाटतं.

समाजाला वैचारिकतेपासून फार काळ दूर पळणं मानवणारं नाही, आपल्या नजीकच्या भविष्यात वैचारिक स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी अनेक प्रकारचे संघर्ष करावे लागणार असल्याची चिन्हं आताच दिसू लागली आहेत. आज माध्यमं आर्थिक कोंडीत सापडली आहेत, प्राध्यापक सरकारी बंधनात अडकले आहेत, लेखक मंडळी शहामृगासारखी जमिनीत तोंड खुपसून बसली आहेत. वैज्ञानिकांनी आम समाजापासून आपली नाळ तोडण्यातच इतिकर्तव्यता मानली आहे. आपल्यात समाजचिंतन करणारे वैज्ञानिक नाहीत, समाजहितदक्ष इतिहासकार नाहीत, समाजहितपरायण पत्रकार नाहीत, समाजसुधारक साहित्यिक नाहीत. अभिव्यक्ति-स्वातंत्र्याचा संकोच सर्व बाजूंनी आणि सर्व प्रकारे होत असताना समाजात स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते नसावेत, हे उद्याच्या नागरिकांना वैचारिक स्वातंत्र्याची मोठीच लढाई खेळावी लागणार असल्याचंच लक्षण आहे. 'भावना दुखवण्या'चा बाऊ समाजात होत राहण्यानं उद्याच्या इतिहासकारांना सत्य इतिहास लिहिणं कठीण होईल. पत्रकारांना सत्य बातमी प्रसिद्ध करणं मुश्किल होईल. साहित्यिकांना आपली प्रतिभा असत्याच्या दावणीला बांधावी लागेल.

आविष्कार आणि विचारस्वातंत्र्याचा संकोच होत राहणं म्हणजे विचारांचं तसंच कलाविष्कारांचं अस्तित्व नाकारणं आणि काल-परवापर्यंत सहिष्णू संस्कृतीचा लाभ घेत शांतता व सौहार्द अनुभवणाऱ्या समाजाची प्रबोधन-प्रक्रिया थांबणं. प्रबोधनप्रक्रिया थांबली तर साहित्य-कलांचा अंत व्हायला कितीसा काळ लागणार? हे ध्यानात घेऊन साहित्यिक, पत्रकार, प्राध्यापक, वैज्ञानिक यांनी आपापल्या माध्यमाच्या प्रकृतीला साजेसं प्रबोधन करणं आवश्यक आहे. प्रबोधन झाल्याशिवाय म्हणजे समाज-मन बदलल्याशिवाय, ते सुबुद्ध आणि निर्भय झाल्याशिवाय आपल्याला गती नाही. सुबुद्ध होणं म्हणजे व्यवहारी होणं नव्हे, तसेच निर्भय होणं म्हणजे बेडर होणं नव्हे. दरारा आणि दहशत यांत जसं अंतर आहे, तसं सुबुद्ध आणि व्यवहारी, निर्भय आणि बेडर यांत अंतर आहे. दराऱ्यामध्ये आदराची भावना आहे, दहशतीत हिंसेची भीती आहे. सुबुद्धपणाला विचारांचं अधिष्ठान आहे, व्यवहारीपणाला मतलबाची किनार आहे. निर्भयतेत सत्याचा शोध असतो, तर बेडरपणात असत्यावर पांघरूण घालण्याचा अविचार असतो.

समाजातील प्रबोधनप्रक्रिया थांबवायची नसेल तर आजचे साहित्यिक, पत्रकार, प्राध्यापक, वैज्ञानिक यांनी आपापली सामाजिक जबाबदारी पार पाडणं अगत्याचं आहे. एकानं दुसऱ्याला अंधश्रद्ध ठरवून, दुसऱ्यानं पहिल्याला पाखंडी ठरवून जसं समाज-मन बदलणार नाही, तसंच एकानं दुसऱ्याला भ्रष्ट ठरवून, दुसऱ्यानं पहिल्याला भेकड ठरवूनही ते बदलणार नाही. भावनेपेक्षा विचार आणि विवेक श्रेष्ठ मानणाऱ्या समाजालाच प्रबोधनाचा प्रकाश दिसतो, हे न ओळखलेल्यांच्या लोकशाहीत विचार-स्वातंत्र्यासाठी अधूनमधून लढाया खेळाव्याच लागणार आहेत. उदारमतवादी व्यवसायातील व्यक्तींचं निष्क्रिय राहणं, हे विचार-स्वातंत्र्याच्या दृष्टीनं घातक आहे. विचार-स्वातंत्र्याचा संकोच होत राहिला, तर राजकीय स्वातंत्र्य मिळवणं हे तुलनेनं सोपं होतं असं वाटू लागेल. जिंकायला कठीण असतानाही सामाजिक प्रगतीची लढाई जिंकण्यासाठी समाज-मनाची तयारी करून घेण्यातच विचारवंतांच्या कार्याची फलश्रुती आहे. एकोणिसाव्या शतकात सामाजिक प्रगतीचे कित्येक टप्पे गाठणाऱ्या समाजधुरिणांच्या पिढ्यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याला प्राधान्य दिलं. राजकीय स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पुन्हा सामाजिक स्वातंत्र्यासाठी लढाई करण्यासाठी समाज तयार होईल, अशी राज्यघटना-कारांची अपेक्षा होती. ती फोल ठरली आहे. राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या कैफात समाज-मन कुठं भरकटलं याचा विचार करण्याचंही आपल्या विचारवंतांनी टाळलं. सारा समाज व्यावहारिक यशामागे पळू लागला. साधनशुचितेचा आग्रह सुटला, चित्तवृत्ती बहलविण्यातच धन्यता मानू लागला. जीवन-तत्त्वज्ञानाशी त्यानं फारकत घेतली. मनोरंजनाचा मार्ग त्यानं स्वीकारला. ही स्पृहणीय अवस्था म्हणता येणार नाही. ही अवस्था लवकरात लवकर संपणं निकडीचं आहे. स्वातंत्र्याची लढाई अजून संपलेली नाही. विचारस्वातंत्र्यासाठी तर भव्य लढाया खेळाव्या लागणार आहेत. आपले समाज-सुधारक हे आव्हान पेलतील अशी अपेक्षा आणि आशा आहे.

**अरुण टिकेकर**
ए-३, विनायक सोसायटी,
गांधीनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
Mob. 9821259512
aroontikekar@gmail.com

ओळख । अंबरीश मिश्र

# जनांस वाटे हा असावा

एकोणिसाव्या शतकाला एक मोठी फेरी मारून न्या. महादेव गोविंद रानडे, सर भांडारकर, गोपाळकृष्ण गोखले, आगरकर, शेजवलकर, माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन, श्री. रा. टिकेकर अशा वैभवशाली नगरांमधून मजल दरमजल करत एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या अखेरच्या महिन्याचा किनारा गाठायचा. अंमळ विसावा घेतला की थेट पानिपतकडे कूच करायचं अन् मग एकदम भविष्याच्या दिशेनं एक मोठी सुपरसॉनिक झेप घ्यायची... डॉ. अरुण टिकेकरांच्या गप्पा म्हणजे एक रोलरकोस्टर राइड असते. अन् प्रवास संपताना घडतं इतिहासाचं भव्य, थ्री-डायमेन्शनल दर्शन.

शिलालेख, बखरी, रोजनिश्या, पोवाडे अन् पत्रांच्या ढिगाऱ्यातून इतिहास एका दिव्य क्षणी बाहेर पडतो आणि सगळे भेद, सगळ्या सीमा ओलांडून एक निखळ सत्य म्हणून उभा राहतो. स्वत:तल्या सामर्थ्यानं तेजाळत असतो. हे सगळं प्रकरण फार गुंतागुंतीचं आणि थक्क करून टाकणारं असं असतं. ते समजून घेण्याची एक सूक्ष्म, चिकित्सक दृष्टी – एक खास 'नजर' – डॉ. टिकेकरांकडे आहे.

मुळातच इतिहास हा डॉ. टिकेकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. 'स्थल-काल' या ग्रंथातल्या पहिल्याच लेखात ते म्हणतात : इतिहास ही संवेदना आहे. अधिक सक्षम करण्यासाठी तिला खतपाणी घालून वाढवावी लागते. ती मुळातच नसेल तर बाणवावी लागते, जोपासावी लागते. एखाद्या ऐतिहासिक स्थळाला भेट दिल्यावर भग्न, विदीर्ण वास्तूच्या दर्शनानं त्या वास्तूशी संबंधित एखादी ऐतिहासिक घटना नजरेसमोर तरारत नसेल, एखाद्या इतिहास पुरुषानं वापरलेली चीजवस्तू, त्यानं लिहिलेलं पत्र वा हाताळलेला, अभ्यासलेला ग्रंथ आपल्या हाती आल्यास आपल्या शरीरात अनोख्या आनंदाची शिरशिरी येऊन अंग पुलकित होऊन उठत नसेल, तर आपली ही संवेदना हरपली आहे, असंच समजावं लागेल.


मुळातल्या जिव्हाळ्याला तर्कशुद्ध विचारांची बैठक लाभली. चतुरस्र वाचन आणि चिंतनामुळे डॉ. टिकेकरांचं संशोधन सर्वंकष आणि सर्वस्पर्शी झालंय. एक श्रेष्ठ संशोधक म्हणून केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशपातळीवर डॉ. टिकेकरांनी मोठी मान्यता मिळवली आहे. हा मान त्यांना शोभून दिसतो.


डॉ. टिकेकर सोलापूरचे. तिथल्या एका विद्याप्रेमी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. बालपण पुस्तकांच्या सहवासात गेलं. त्यांचे आजोबा रामचंद्र विनायक टिकेकर हे मराठीचे पहिले स्तंभलेखक. ते 'केसरी'त 'धनुर्धारीचे वाग्बाण' नावाचं सदर लिहित असत. 'वाईकर भटजी' या कादंबरीचे कर्ते रामचंद्र विनायक टिकेकर. डॉ. टिकेकरांचे वडील चिंतामणी रामचंद्र 'दूत' नावाचं मासिक चालवत असत. कारखानदारी या विषयाला वाहिलेलं 'दूत' हे मराठीतलं पहिलं मासिक. आपल्या गुरूंचं ऋण मान्य करताना डॉ. टिकेकर सोलापूरच्या हरिभाई देवकरण प्रशालेचे मुख्याध्यापक के.पं. मंगळवेढेकर, प्राध्यापक भोगीशयना आणि मुंबई विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख प्राध्यापक जी.सी. बॅनर्जी या त्रिमूर्तींचा आवर्जून आणि कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात. तर विख्यात पत्रकार-लेखक श्री.रा. टिकेकर आपल्या पुतण्याचे आधारवडच ठरले. ग्रंथप्रेम, वाचन-संस्कृती आणि संशोधनवृत्ती हे संस्कार डॉ. टिकेकरांना काकांकडून मिळाले. श्री.रां.नीच त्यांच्यासमोर एकोणिसाव्या शतकातला महाराष्ट्र सादर केला. इतिहासाचार्य राजवाडे, सर जदुनाथ सरकार, श्रीधर व्यंकटेश केतकर, त्र्यंबक शंकर शेजवलकर, अनंत काकबा प्रियोळकर, सेतुमाधवराव पगडी, दत्तो वामन पोतदार, न.र. फाटक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. दुर्गाबाई भागवत, इरावतीबाई कर्वे अशा उत्तुंग विद्वानांच्या इतिहासविषयक संशोधनाचा आवाका आस्ते आस्ते पुतण्याच्या लक्षात आला. महाराष्ट्राच्या समृद्ध वैचारिक परंपरेचं मोठेपण समजत गेलं. त्यातूनच डॉ. टिकेकरांच्या कामाचं स्वरूप निश्चित झालं. कामाला वेग आला.


डॉ. टिकेकर स्वतःचं वर्णन निःपक्ष आणि उदारमतवादी – नॉन–कॉन्फर्मिस्ट लिबरल – असं करतात. ते न्या. रानडे 'स्कूल'चे आहेत हे सुद्धा आपण लक्षात ठेवलं पाहिजे. एकोणिसाव्या शतकातल्या 'रेनसां' चळवळीचा महाराष्ट्रावर अतिशय खोल आणि दूरगामी असा परिणाम झाला. माणुसकी, उदारमतवाद आणि विवेक या त्रिसूत्रीवर आधारलेल्या या सामाजिक–वैचारिक उन्नयनाचे आद्य प्रणेते म्हणून न्या. रानडे यांचा मान आहे. भारतासारख्या देशात सामाजिक सुधारणेची गती मंद असेल. समाज टप्प्याटप्प्यानं, सावकाश चालीनं संक्रमित होत जाईल. परंपरेशी पूर्णपणे फारकत घेऊन सुधारणा शक्य नाही, अशी न्या. रानडेंची भूमिका आहे. त्यांनी पाश्चात्य उदारमतवाद आणि भारतीय धर्मविचार यांची सांगड घातली. हे सगळं डॉ. टिकेकरांना मान्य आहे. मात्र, न्या. रानडेंची धर्मपरायणता आणि ईश्वरलीनता त्यांना मंजूर नाही. डॉ. टिकेकरांनी आगरकरांचा प्रखर बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारला आहे. म्हणजे त्यांनी न्या. रानडे आणि आगरकर यांची सांगड घातली आहे. हे लक्षात घेतलं तर डॉ. टिकेकरांचा विचार–व्यूह आपल्याला बराच समजेल.


डॉ. टिकेकरांची वैचारिक मांडणी सौम्य आहे. त्यांचं लिखाण संथखोल असतं. वरची पट्टी ते वर्ज्य मानतात. आपल्या मतांवर ते ठाम असतात, दुराग्रही कधीच नसतात. धारदार तर्क, बुद्धिवाद आणि विवेक या गुणांमुळे त्यांचं लिखाण उजळून निघतं. एक सुसंस्कृत, बुद्धिमान पुरंध्री हातांत दिवा घेऊन स्वतःच्या भव्य, खानदानी वाड्यातून आपल्याला फिरवून आणते आहे असं डॉ. टिकेकरांची पुस्तकं वाचताना वाटत राहतं.


डॉ. टिकेकरांची ग्रंथसंपदा विपुल आहे. 'द किंकेडस्' हा त्यांचा पीएच.डी.चा प्रबंध (१९९२ साली ग्रंथरूपानं प्रकाशित झाला) अतिशय गाजला. किंकेड पिता–पुत्र भारतात अंमलदार म्हणून कार्यरत होते. दोघांचा काळ भिन्न, त्या काळाची परिस्थिती वेगळी. त्यांच्या कारकीर्दीची आणि एकोणिसाव्या शतकातल्या धकाधकीची विस्तृत आणि अभ्यासपूर्ण अशी समीक्षा डॉ. टिकेकरांनी या पुस्तकात केली आहे. 'कालमीमांसा'मध्ये त्यांनी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांतल्या अपूर्व अशा वैचारिक संक्रमणाचा वेध घेतला आहे. 'शहर पुणे'चे दोन्ही खंड म्हणजे पुण्याच्या










सांस्कृतिक परंपरांचा मौल्यवान दस्तावेज. तर, 'द क्लॉयस्टर्स पेल' : अ बायोग्राफी ऑफ द युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे' हा केवळ मुंबई विद्यापीठाचा इतिहास नसून शिक्षणामुळे सर्वांगानं बहरून आलेल्या समाजाचा चित्तवेधक वृत्तांत आहे.

डॉ. टिकेकरांचं लिखाण जड असतं असं काहींचं म्हणणं असतं. या आक्षेपाला 'जन-मन' या पुस्तकानं चोख उत्तर दिलंय. जन (पॉप्युलर) आणि महाजन (एलिट) यांच्यातील सांस्कृतिक नातेसंबंधांचा आढावा घेणाऱ्या या पुस्तकाची शैली सुगम आणि रसाळ आहे. थोर व्यासंगी डॉ. अशोक रानडे 'जन-मन' विषयी म्हणतात :

'...टिकेकरांच्या कामाचे अप्रूप एवढ्यासाठी आहे, की अभ्यासाची संदर्भसामग्री असंख्य जीवनक्षेत्रांतून गोळा करावी लागते. ही सामग्री व्यवस्थित लावलेली, एकत्रित कधीच मिळत नाही. क्षुद्र वाटणाऱ्या तपशिलातून, गृहीत धरून दुर्लक्ष केलेल्या जीवन व्यवहारातून, लिखित-मुद्रित-ग्रथित नसलेल्या 'पुराव्यांवरून' अंदाज बांधत संस्कृतीचे स्वरूप जाणण्याकरिता आवश्यक ते संदर्भ पुरवणारी सामग्री खरे पाहता निर्माण करावी लागते. टिकेकरांच्या प्रयत्नांच्या स्वरूपाचे 'कल्चरल डॉक्युमेंटेशन' असेच वर्णन करता येईल... टिकेकरांच्या लिखाणाकडे माणसे आवडीने वळतील, कारण माणसाच्या आवडीच्या वस्तूंचे गुण गाण्याचे पथ्य ते आनंदाने पाळतात.'

केवळ क्रियापदापुरतं मराठी बोलणाऱ्यांना सोप्या, सुटसुटीत मराठीतला हा डॉ. अशोक रानड्यांचा अभिप्रायही क्लिष्ट वाटू शकतो!

**डॉ. टिकेकरांची वैचारिक मांडणी सौम्य आहे. त्यांचं लिखाण संथखोल असतं.
वरची पट्टी ते वर्ज्य मानतात. आपल्या मतांवर ते ठाम असतात, दुराग्रही कधीच नसतात.
धारदार तर्क, बुद्धिवाद आणि विवेक या गुणांमुळे त्यांचं लिखाण उजळून निघतं.
एक सुसंस्कृत, बुद्धिमान पुरंध्री हातांत दिवा घेऊन स्वत:च्या भव्य, खानदानी वाड्यातून आपल्याला फिरवून आणते आहे असं डॉ. टिकेकरांची पुस्तकं वाचताना वाटत राहतं.**

डॉ. टिकेकरांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात अध्यापनानं केली यात नवल नाही. ते एम.ए.साठी मुंबईला आले (साल : १९६४-६५, अंदाजे. अस्सल पुरावा डॉक्टरसाहेबांकडून काढायला हवा) तेव्हा त्यांना पैशाची चणचण भासत होतीच. त्यांना महिना रु. ७५ची एक शिकवणी मिळाली. त्यांतले रु. ३७.५० पैसे ते सोलापूरच्या घरी पाठवत. रु. १०ची मनीऑर्डर एका जवळच्या महिला नातेवाईकाला दरमहा जात असे. उरलेल्या रु. २७.५० पैसे या घसघशीत रकमेवर महिना काढायचा.

मुंबईतल्या चार प्रतिष्ठित महाविद्यालयांमध्ये अध्यापनाचं काम केल्यानंतर डॉ. टिकेकर १९७६ साली नवी दिल्लीतल्या यु.एस. लायब्ररी ऑफ काँग्रेस या मातब्बर संस्थेत ॲक्विजिशन स्पेशलिस्ट म्हणून काम पाहू लागले. यु.एस. लायब्ररी ऑफ काँग्रेससाठी योग्य त्या पुस्तकांची निवड करणं, ती मिळवणं, पुस्तकांचं क्षेम-कुशल पाहणं असं या कामाचं स्वरूप होतं. पाच वर्षांनंतर डॉ. टिकेकर मुंबईला परत आले आणि 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या कार्यालयात संदर्भविभागाचे प्रमुख म्हणून रुजू झाले. हा महत्त्वाचा टप्पा. यानंतर डॉ. टिकेकरांची कारकीर्द बहरते.

श्री. गोविंदराव तळवलकरांची सूचना म्हणा किंवा आग्रह, डॉ. टिकेकरांनी 'टाइम्स'च्या संदर्भविभागातून आपलं बिऱ्हाड 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये हलवलं. 'म.टा.'मध्ये ते १९८५ साली ज्येष्ठ साहायक संपादक या पदावर रुजू झाले. तिथं साडे-चार वर्षं काम केल्यानंतर 'टाइम्स'च्या अर्काव्हियल रिसर्च विभागाचे प्रमुख म्हणून दोन वर्षं काम केलं आणि १९९१ साली ते 'लोकसत्ता'चे संपादक झाले. 'लोकसत्ते'चं कप्तानपद त्यांनी अकरा वर्षं समर्थपणे सांभाळलं.

वाचन-व्यासंगाच्या शिस्तीत वाढलेला डॉ. टिकेकरांसारखा माणूस पत्रकारितेच्या तात्कालिक आणि विलक्षण घाईगर्दीच्या; लहरी (वाचकांची लहर सांभाळून पेपर चालवावा लागतो) आणि बेभरवशाच्या (मालकाचा भरवसा देता येत नाही, सहकाऱ्यांचाही नाही) जगात येतो आणि वीसेक वर्षं छान रमतो ही खरं तर विसंगती वाटते. डॉ. टिकेकरांना मात्र तसं वाटत नाही. संशोधन आणि पत्रकारिता या परस्परपूरक गोष्टी आहेत असं ते मानतात. ते आपण मान्य करू आणि डॉ. टिकेकरांच्या पत्रसृष्टीतल्या कारकीर्दीचा विचार करू.

ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात डॉ. टिकेकर पत्रकारितेत रीतसर दाखल होतात. हा काळ महत्त्वाचा मानला पाहिजे. एकीकडे पत्रसृष्टीचा विस्तार होत असताना भारतातल्या मध्यमवर्गाचे सरळसरळ दोन भाग पडले. उच्च शिक्षण आणि तंत्रकौशल्याच्या बळावर वरचा भाग

अधिकाधिक वर जाऊ लागला. याच वर्गातले बरेचसे उच्चशिक्षित आणि तंत्रनिष्णात (आय.आय.टी., वर्ल्ड बँक, व्यवस्थापन या क्षेत्रांतले) तरुण १९८०च्या दशकात पत्रकार-संपादक झाले. या मंडळींनी पत्रकारितेची नवी मांडणी केली. सत्ताधीशांना वठणीवर आणायचं, त्यांना सतत धारेवर धरायचं आणि मीडियाची सत्ता निरंकुश कशी राहील ते पाहायचं असा हा अजेंडा होता. आणीबाणीच्या काळात आपण हताश झालो, सत्ताधीशांपुढे आपण नांगी टाकली याबद्दलची मध्यमवर्गाची चीड, खंत या अजेंड्यातून ठळकपणे व्यक्त होते. राजकारण आणि मीडिया ही दोन तुल्यबळ सत्ताकेंद्रं एकमेकांसमोर उभी ठाकणार हे तर उघडच होतं.

याच सुमारास कॉर्पोरेट सेक्टरनं मीडियावर आपलं जाळं टाकलं. जाहिरात कंपन्यांचं प्रस्थ वाढलं. यातून एक फार वेगळीच आणि विलक्षण धोकादायक अशी 'पेट्रनाज' संस्कृती तयार झाली. त्याचे भयानक परिणाम आज आपल्यासमोर येत आहेत. मनोरंजन आणि ग्लॅमरचा आधार घेऊन मीडियानं आपला व्याप वाढवला. रंगीत पुरवण्या, गुळगुळीत छायाचित्रं, उत्तम छपाई यांसाठी बराच पैसा लागतो. त्यामुळे निर्मितीचा खर्च बेसुमार वाढला. हे सगळं लचांड समजून घेण्यासाठी अन् पुढं रेटण्यासाठी संपादकाकडे 'मॅनेजरिअल स्किल्स' असलेच पाहिजेत असं मालकांनी ठरवलं. व्यासंगापेक्षा व्यवस्थापनाला महत्त्व आलं. अशी ही मांडणी आहे. या नव्या मांडणीत स्कॉलर-एडिटरला फारसा वाव नाही हे डॉ. टिकेकरांच्या लक्षात आलं असणारच. तरीही ते पत्रसृष्टीत येतात आणि वाचन-संस्कृती, नि:पक्ष, मुद्देसूद प्रतिपादन, संयम आणि फॅक्टस्‌चा आग्रह ही संशोधनक्षेत्रातली मूल्यं पत्रकारितेत रुजवतात. हे अतिशय महत्त्वाचं आणि मोलाचं आहे.

वर्तमानपत्र हे वाचकांच्या उपयोगी पडलं पाहिजे हे 'लोकसत्ता'चे संपादक म्हणून डॉ. टिकेकरांचं ब्रीद होतं. तसंच, त्यांनी विश्वासार्हतेला सर्वांत अधिक महत्त्व दिलं. वर्तमानपत्रांचे वाचक नानाविध विचारांचे, मतांचे आणि भिन्न आवडनिवड जोपासणारे असतात. प्रत्येक वाचकाला सकस आणि दर्जेदार असं वाचायला मिळावं याकडे डॉ. टिकेकरांचं विशेष लक्ष असायचं. लोकरंग, रंग-तरंग, चतुरंग वगैरे पुरवण्यांमधून चटकदार, रंजक आणि माहितीपूर्ण लेख येत असत. यासाठी डॉ. टिकेकरांनी मान्यवर लेखकांचं आणि तज्ज्ञांचं लेखनसाहाय्य मिळवलं. सार्वजनिक प्रश्नांवर 'लोकसत्ता'ने अनेक कॅम्पेन्स केले. त्याचप्रमाणे विधायक कामांची आवर्जून नोंद घेतली. डॉ. टिकेकरांच्या अकरा वर्षांच्या कारकीर्दीत 'लोकसत्ता'ला चळवळीचं स्वरूप आलं.

सहासष्टाव्या वर्षी डॉ. टिकेकरांच्या डोक्यात अनेक संकल्पांचा खर्जभरणा सुरू आहे. द रॉयल एशियाटिक सोसायटीचे अध्यक्ष म्हणून अनेक जबाबदाऱ्या ते पार पाडत आहेतच. शिवाय, पानिपत, गांधीहत्या आणि शिवसेना या महाराष्ट्राच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांवर विश्लेषणपर लिहावं असं त्यांच्या मनात आहे. शिवसेनेनं मराठी अस्मितेची चुकीची मांडणी केली. त्यामुळे मराठी समाज इंग्रजीपासून दूर झाला. परिणामी, वैचारिक क्षेत्रात महाराष्ट्राची पीछेहाट झाली, असं डॉ. टिकेकरांचं म्हणणं आहे. ''एके काळी महाराष्ट्राची बायलिंग्वल परंपरा होती. ती शिवसेनेनं संपवली. न्या. रानडे, भांडारकर, गोपाळकृष्ण गोखले, डॉ. आंबेडकर यांनी मराठीप्रमाणेच इंग्रजीतही दर्जेदार लिखाण केलं. त्यामुळे वैचारिक क्षेत्रात महाराष्ट्राचा दबदबा राहिला. आज मात्र तशी परिस्थिती नाही. ''आज बंगाली विचारवंतांना देशपातळीवर आणि जगात मोठा मान मिळतो. याचं कारण बंगाली माणूस आपल्या मातृभाषेचा, संस्कृतीचा अभिमान धरतो, परंतु इंग्रजीचा दुस्वास करत नाही'', हे डॉ. टिकेकरांचं मत कुणीही नाकारणार नाही.

'सारेच दीप कसे मंदावले आता' अशी आजची एकूण परिस्थिती असली तरीही महाराष्ट्राचं कोंडलेलं क्षितिज लवकरच मोकळं होईल असा विश्वास डॉ. टिकेकर व्यक्त करतात. ''राजकारण, समाजकारण किंवा मीडिया या क्षेत्रांत सध्या जे काही सुरू आहे ते तसं फार काळ चालणार नाही. हा धुरळा आस्ते आस्ते खाली बसेल आणि महाराष्ट्र पुन्हा एकदा Pure thought कडे, कला-शास्त्र आणि ज्ञानाकडे वळेल. आणि व्यासंगाचं एक अभिजात पर्व पुन्हा सुरू होईल'', असं त्यांना वाटतं. भूतकाळाचं ओझं वाहणाऱ्या महाराष्ट्राच्या दणकट खांद्यावर इतिहासाचं फुलपाखरू अल्लद बसावं हीच डॉ. टिकेकरांची इच्छा आहे.

**अंबरीश मिश्र**
६१, भाग्यनगर, चौथा मजला, चंदावरकर रोड,
बोरीवली (प.), मुंबई ४०००९२.
Tel. 022-28950938.